श्री कालिकादेवी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, कराड.
मुख्य कार्यालय : ६/१ गुरुवार पेठ, कासार गल्ली कराड जि.सातारा
फोन नं. (०२१६४) २२०६८०

Regd.No.SAT/KRD/RSR/CR/751/88-89/8-7-1988

# ३७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचीनोटीस

(फक्त सभासदांसाठी )

श्री कालिकादेवी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित , कराड या संस्थेच्या विद्यमान सभासदांची ३७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक २२/०९/२०२४ रोजी सकाळी ठीक ११ वा. **श्री कृष्णाबाई प्रितीसंगम सांस्कृतिक केंद्र (नविन) ३७५सोमवार पेठ कराड** येथे मा. चेअरमन साहेब यांचे अध्यक्षतेखाली होणार आहे. तरी सदर सभेस संस्थेच्या सर्व सभासदांनी उपस्थित रहावे, हि विनंती.

## • सभेपुढील विषय•

1) ३७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस वाचन करणे.
2) दिनांक १७/०९/२०२३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे.
3) अहवाल वाचन व त्यास मंजुरी ३१ मार्च २०२४ चा ताळेबंद नफा-तोटा पत्रक वाचून मंजूर करणे.
4) संचालक मंडळाच्या शिफारशी प्रमाणे सन २०२३-२४ सालाचे नफा वाटणीस मंजुरी देणे व लाभांश जाहीर करणे.
5) सन २०२३-२४ चा सरकारी लेखापरीक्षण अहवाल वाचून त्यास मान्यता देणे.
6) सन २०२४-२५ सालाकरिता वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
7) सन २०२३-२४ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाच्या दोषदुरूस्ती पूर्तता अहवालाची नोंद घेणे.
8) सन २०२४-२५ सालासाठी अंदाजपत्रक मंजूर करणे.
9) सन २०२३-२४ सालचे अंदाजपत्रकाहुन जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे.
10) सदर वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
11) ऐनवेळी येणारे विषय मा. चेअरमन साहेब यांच्या पूर्व परवानगीने.

दिनांक:१४/०८/२०२४

स्थळ – कराड

श्री. विवेक पद्मराज वेळापुरे
कार्यलक्षी संचालक
( संचालक मंडळाचे आदेशावरून )

## • सूचना •

1) सभेमध्ये ज्या सभासदांना प्रश्न विचारायचे असतील त्यांनी ते दिनांक १९/०९/२०२४ पूर्वी सकाळी १० ते सायं. ६ या वेळेत संस्थेच्या कार्यालयात लेखी दिले पाहिजे.
2) गणसंख्या अभावी सभा तहकूब झाल्यास सदर वार्षिक सर्वसाधारण सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर होईल व सभेचे कामकाज पूर्ण केले जाईल.
3) सभासदांना अहवाल, ताळेबंद पत्रक व नफा-तोटा पत्रक संस्थेच्या मुख्य कार्यालयात कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत पहावयास मिळेल .तसेच सन २०२३-२०२४ चा वार्षीक अहवाल शाखेत तसेच संस्थेच्या www.shreekalikadevi.com या वेबसाईटवर उपलब्ध आहे.
4) सभासदांना मंजुर झालेला डिव्हीडंड त्यांचे शाखेतील सेव्हींगजखातेस वार्षीक सभेनंतर वर्ग केला जाईल.
5) सभासदांनी संस्थेच्या शाखेत संपर्क साधुन एसएमएस ,ईमेल तसेच व्हॉटसअँप सुविधा असलेल्या मोबाईल क्रमांकाची नोंद शाखेच्या दप्तरी करुन घ्यावी.